## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) दक्षता शाखेकडून दिनांक ०५/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१२/जा.११९, दिनांक ०७/०३/२०१२ व १६/०३/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१२/जा.१२०, दिनांक ०७/०३/२०१२.

४) अ.शि.वा.दुकान क्र. २५ ड १९४ मधील मेहता कमलेश रामजीत गुप्ता व टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक अशोक गं. आंबेकर यांचे दि.२८/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१२/जा. २९२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :-०७/०५/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २७/०२/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह ठिक ०३.१५ वाजता यारी रोड, वर्सोवा या दिशेने चालत निघाले असता, डाव्या हातावरील सिल्वा पखाडी लेन, यारी रोड, वर्सोवा येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ समोरुन टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा टेम्पो चालू करुन निघत असताना पथकाने सदर टेम्पो थांबविला. पथकाने सदर टेम्पो चालकाकडून टेम्पोची कागदपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स व टेम्पोची चावी ताब्यात घेतली. सदर टेम्पोचा चालक यास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव रामसुरत जगन्नाथ प्रसाद असे असल्याचे पंचासमक्ष सांगितले. सदर टेम्पोत असलेल्या गव्हाची बाचकी पंचासमक्ष मोजली असता, ८० बाचकी असल्याचे आढळले.

पथकाने सदर गव्हाबाबत विचारणा केली असता, रामसुरत जगन्नाथ प्रसाद याने सांगितले की, टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा अशोक जी. आंबेकर याच्या मालकीचा असून मागील दोन महिन्यापासून प्रति महा

रुपये ७,५००/- पगारावर तो चालकाचे काम करत आहे. दिनांक २७/०२/२०१२ रोजी वाकोला नाक्यावर गाडी (टेम्पो) भाड्याकरिता उभी असताना अंधेरीस्थित एका व्यक्तीने (नांव माहिती नाही) अंधेरी (प) येथून सामान भरुन ते सांताक्रुझ येथे नेण्याकरिता टेम्पो भाड्याने ठरवून त्याला सिल्वा पखाडी लेन, यारी रोड येथे बोलावून घेतले. सिल्वा पखाडी लेनवरील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ येथे बोलावून सदर अधिकृत शिधावाटप दुकानातून गव्हाची ८० बाचकी भरुन सदरचा गहू सांताक्रुझ येथे नेण्याचे सदर अज्ञान व्यक्तीने (नांव माहिती नाही) सांगितले. सांताक्रुझ येथे गव्हाच्या साठ्यासह टेम्पो पोहचल्यानंतर तो कोठे उतरवावयाचा याबाबतची माहिती सदर व्यक्ती त्याला त्याच्या भ्रमणध्वनीवर कळविणार होता, असे त्याने पंचासमक्ष सांगितले. टेम्पोचा चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याचे नोंदविण्यात आलेल्या जबाबास अनुसरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानास पथकाने पंचासह भेट दिली. भेटीच्या वेळी अधिकृत शिधावाटप दुकानात उपस्थित असलेले इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव कमलेश रामजीत गुप्ता असे असल्याचे पंचासमक्ष सांगितले. पथकातील अधिकाऱ्यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानासमोर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये असलेल्या गव्हाच्या बाचक्यांबाबत विचारणा केली असता, कमलेश रामजीत गुप्ता याने पंचासमक्ष सांगितले की, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामध्ये मेहता म्हणून मागील ३-४ महिन्यापासून प्रतिमहा रुपये ४,०००/- पगारावर काम करीत आहे. सदर दुकानाच्या सौ. शशीकला राजू सिंग या प्राधिकारपत्रधारक आहेत. त्यांचे नातेवाईकाचे उत्तरप्रदेश येथे लग्न असल्यामुळे त्या दिनांक २५/०२/२०१२ रोजी तेथे गेल्याचे सांगितले. त्यांचे अनुपस्थितीमध्ये सदर दुकानाचा मेहता म्हणून सर्व कामकाज पाहत असल्याचे सांगितले. दिनांक २७/०२/२०१२ रोजी दुपारी टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याचे सोबत असलेली एक अज्ञात व्यक्ती (नांव माहिती नाही) हे दोघे तो काम करीत असलेल्या दुकानात आले. सदर अज्ञात व्यक्तीने त्याच्याकडे विचारणा केली की, त्याच्या दुकानामध्ये गव्हाचा साठा उपलब्ध आहे काय ? व त्यातील काही गव्हाची बाचकी त्याला काळ्याबाजाराने मिळतील काय ? त्यानुसार त्याने त्यांना काळाबाजाराने ८० बाचकी गहू प्रति किलो ८.००/- रुपये या दराने देण्यास संमती दर्शविली. तदनंतर तो काम करीत असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ मधून गव्हाची ८० बाचकी टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये भरण्यात आली. भरण्यात आलेल्या सदरचा गहू कोठे घेऊन जाणार होते हे त्याला माहित नसल्याचे पंचासमक्ष सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मधील साठ्याची मोजदाद करुन सदर टेम्पोमध्ये भरलेला गहू हा शासन अनुदानित दराचा असताना तो अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या स्वत:च्या फायद्याकरता काळ्याबाजारामध्ये विकण्याचे उद्देशाने वाहतूक होत असलेचे सिध्द झालेवरुन पंचांसमक्ष तो जागीच जप्त करण्यात आला. दरम्यानच्या काळात अधिकाऱ्यांनी वर्सोवा पोलिस ठाणे येथे प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना घटनेची माहिती दिली. त्यानुसार सदर पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार श्री. सुरेश तुकाराम इंगावले, बक्कल क्र. २००२४ हे घटनास्थळी हजर झाले. अधिकाऱ्यांनी त्यांना आरोपी व मुद्देमालासह घटनेची सविस्तर माहिती देऊन मुद्देमाल व दोन्ही आरोपीस पंचांसमक्ष पोलिसांच्या ताब्यात दिले.

अशाप्रकारे टेम्पो चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ चे मेहता कमलेश रामजीत गुप्ता यांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा गहू अवैध मार्गाने प्राप्त करुन अनधिकृतपणे बेकायदेशिर खरेदी करुन गरजू व पात्र शिधापत्रिकाधारकांना गव्हापासून वंचित ठेऊन व स्वत:च्या फायद्यासाठी विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७ व ८ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम १८ (३) (एएए) चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द वर्सोवा पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०७/२०१२ दि.२७/०२/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | शिधावाटप यंत्रणेवरील ८० बाचके गहू (प्रत्येक बाचक्याचे वजन अंदाजे ५० कि.ग्रॅ.) | ४००० किलो | ७२,०००/- |
| २ | टाटा टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ | १ नग | ४,००,०००/- |
| | | एकूण | ४,७२,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा

मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १४/०३/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १४/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २८/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामधील मेहता कमलेश रामजीत गुप्ता व टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक अशोक गं. आंबेकर हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच सदर सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद उपस्थित राहिले. परंतू त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून त्यांनी लेखी निवेदनही सादर केले नाही. सदर सुनावणीस पुरेशे संधी देऊन देखील तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद :-</u>**

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक अशोक गं. आंबेकर यांनी युक्तीवाद केला की, तो टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चा मालक आहे. हा टेम्पो नाक्यावर उभा असताना दिनांक २७/०२/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता त्याच्या गैरहजेरीत ड्रायव्हरने भाडयाला नेला. भरलेल्या माला संदर्भात त्यांना काहीच कल्पना नव्हती. भाड्याच्या उद्देशाने ते गेले होते व त्यांचा टेम्पो पकडला गेला. कौटुंबिक घरखर्च, बँकेचा हप्ता ह्या सर्व गोष्टी गाडीवर अवलंबून आहेत. तेव्हा टेम्पोमधील माल उतरवून घ्यावा व त्याचा टेम्पो परत देण्याकरीता परवानगी द्यावी, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामधील मेहता कमलेश रामजीत गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, अ.शि.वा. दुकान क्र. २५ ड/१९४ मध्ये ते मेहता (नोकर) म्हणून काम करीत आहेत. दिनांक २७/०२/२०१२ रोजी आपल्या फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्याच्या दुकानात भेट दिली. ८० बाचके गहू काळ्याबाजारात विकत आहे म्हणून त्याच्यावर वर्सोवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

CONTROLLER ... RATIONING & ... HEAD O... MUMB...

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१२ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह वर्सोवा विभागातील सिल्वा पखाडी लेन, यारी रोड, वर्सोवा येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ समोरुन टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा टेम्पो चालू करुन निघत असताना पथकाने सदर टेम्पो थांबविला. पथकाने सदर टेम्पो चालकाकडून टेम्पोची कागदपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स व टेम्पोची चावी ताब्यात घेतली. सदर टेम्पोचा चालक नामे रामसुरत जगन्नाथ प्रसाद याच्या व पंचासमक्ष सदर टेम्पोत असलेल्या गव्हाची बाचकी मोजली असता, ८० बाचकी असल्याचे आढळले. पथकाने सदर गव्हाबाबत विचारणा केली असता, रामसुरत जगन्नाथ प्रसाद याने सांगितले की, टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा अशोक जी. आंबेकर याच्या मालकीचा असून मागील दोन महिन्यापासून प्रति महा रुपये ७,५००/- पगारावर तो चालकाचे काम करत आहे. दि.२७/०२/२०१२ रोजी वाकोला नाक्यावर गाडी (टेम्पो) भाड्याकरिता उभी असताना अंधेरीस्थित एका व्यक्तीने अंधेरी (प) येथून सामान भरुन ते सांताक्रुझ येथे नेण्याकरिता टेम्पो भाड्याने ठरवून त्याला सिल्वा पखाडी लेन, यारी रोड येथे बोलावून घेतले. सिल्वा पखाडी लेनवरील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ येथे बोलावून सदर अधिकृत शिधावाटप दुकानातून गव्हाची ८० बाचकी भरुन सदरचा गहू सांताक्रुझ येथे नेण्याचे सदर अज्ञात व्यक्तीने सांगितले. सांताक्रुझ येथे गव्हाच्या साठ्यासह टेम्पो पोहचल्यानंतर तो कोठे उतरवावयाचा याबाबतची माहिती सदर व्यक्ती त्याला त्याच्या भ्रमणध्वनीवर कळविणार होता, असे त्याने पंचासमक्ष सांगितले. टेम्पोचा चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याचे नोंदविण्यात आलेल्या जबाबास अनुसरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानास पथकाने पंचासह भेट दिली. भेटीच्या वेळी अधिकृत शिधावाटप दुकानात उपस्थित असलेले इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव कमलेश रामजीत गुप्ता असे असल्याचे पंचासमक्ष सांगितले. पथकातील अधिकाऱ्यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानासमोर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये असलेल्या गव्हाच्या बाचक्यांबाबत विचारणा केली असता, कमलेश रामजीत गुप्ता याने पंचासमक्ष सांगितले की, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामध्ये मेहता म्हणून मागील ३-४ महिन्यापासून प्रतिमहा रुपये ४,०००/- पगारावर काम करीत आहे. सदर दुकानाच्या सौ. शशीकला राजू सिंग या प्राधिकारपत्रधारक आहेत. त्यांचे नातेवाईकाचे उत्तरप्रदेश येथे लग्न असल्यामुळे त्या दि.२५/०२/२०१२ रोजी तेथे गेल्याचे सांगितले. त्यांचे अनुपस्थितीमध्ये सदर दुकानाचा मेहता म्हणून सर्व कामकाज पाहत असल्याचे सांगितले.

दि.२७/०२/२०१२ रोजी दुपारी टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याचे सोबत असलेली एक अज्ञात व्यक्ती (नांव माहिती नाही) हे दोघे तो काम करीत असलेल्या दुकानात आले. सदर अज्ञात व्यक्तीने त्याच्याकडे विचारणा केली की, त्याच्या दुकानामध्ये गव्हाचा साठा उपलब्ध आहे काय व त्यातील काही गव्हाची बाचकी त्याला काळ्याबाजाराने मिळतील काय ? त्यानुसार त्याने त्यांना काळाबाजाराने ८० बाचकी गहू प्रति किलो ८.००/- रुपये या दराने देण्यास संमती दर्शविली. तद्नंतर तो काम करीत असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ मधून गव्हाची ८० बाचकी टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये भरण्यात आली. भरण्यात आलेल्या सदरचा गहू कोठे घेऊन जाणार होते हे त्याला माहित नसल्याचे पंचासमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मधील साठ्याची मोजदाद करुन सदर टेम्पोमध्ये भरलेला गहू हा शासन अनुदानित दराचा असताना तो अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या स्वतःच्या फायद्याकरता काळ्याबाजारामध्ये विकण्याचे उद्देशाने वाहतूक होत असलेचे सिध्द झालेवरुन पंचासमक्ष तो जागीच जप्त करण्यात येऊन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामधील मेहता कमलेश रामजीत गुप्ता यांनी केलेल्या खुलाशात, अ.शि.वा. दुकान क्र. २५ ड/१९४ मध्ये ते मेहता (नोकर) म्हणून काम करीत असल्याचे सांगून दिनांक २७/०२/२०१२ रोजी फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्याच्या दुकानात भेट देऊन ८० बाचके गहू काळ्याबाजारात विकत आहे म्हणून त्याच्यावर वर्सोवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचे सांगितले.

तथापी, सदर प्रकरणी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ च्या प्राधिकारपत्रधारकास पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. ही गंभीर बाब आहे. कमलेश रामजीत गुप्ता हा त्यांच्या दुकानात नोकर म्हणून काम करीत असल्याचे त्यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात तसेच सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात सांगितले आहे. परंतू त्यांना सदर दुकानात नोकर म्हणून काम करण्यासाठी प्राधिकृत केल्याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केले नाही. तसेच घटनास्थळी व सुनावणीच्या वेळी सदर दुकानाचे प्राधिकारपत्रधारक हे त्यांच्या मुळ गावी गेल्याचे सबब कमलेश रामजीत गुप्ता यांनी सांगितले आहे. प्राधिकारपत्रधारक यांना शासनाकडून मंजूर झालेले अधिकृत शिधावाटप दुकान ते स्वतः चालवित नसून सदर दुकानाचे सर्व कामकाज कमलेश रामजीत गुप्ता हे पाहत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. यावरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१९४ चे प्राधिकारपत्रधारक यांनी महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ अन्वये त्यांना दिलेल्या प्राधिकारपत्रामधील अटींचा भंग केल्याचे निष्पन्न होत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, पथकाने घटनास्थळी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१९४ या दुकानातून शासन नियंत्रित दराचे ८० बाचके गहू टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये काळाबाजारीच्या उद्देशाने भरले असताना रंगेहाथ पकडले आहे. तसेच कमलेश रामजीत गुप्ता याने घटनास्थळी दिलेल्या जबाबामध्ये टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद व त्याच्या सोबत असलेली एक अज्ञात व्यक्तीने त्याच्या दुकानामध्ये उपलब्ध असलेला गव्हाचा साठा काळाबाजाराने विक्री करणार असल्याबाबत विचारणा केली असता, त्याने सदर दुकानातील ८० बाचके गहू प्रति किलो ८ रुपये या दराने काळाबाजाराने विकण्यास संमती दर्शविल्याबाबत पंचांसमक्ष कबूल केले आहे. यावरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१९४ चे मेहता कमलेश रामजीत गुप्ता याने संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा गहू अवैध मार्गाने स्वतःच्या फायद्यासाठी विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१२/जा.१२०, दिनांक ०७/०३/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक अशोक गं. आंबेकर यांनी केलेल्या खुलाशात, तो टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चा मालक असून त्याचा टेम्पो नाक्यावर उभा असताना दिनांक २७/०२/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता त्याच्या गैरहजेरीत ड्रायव्हरने भाड्याला नेला. भरलेल्या माला संदर्भात त्यांना काहीच कल्पना नसल्याने टेम्पोमधील माल उतरवून घ्यावा व त्याचा टेम्पो परत देण्याकरीता परवानगी द्यावी असे सांगितले आहे. तथापी, टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चा चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याच्याकडील टेम्पोमध्ये घटनास्थळी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१९४ या दुकानातून अनधिकृतरित्या भरण्यात आलेल्या शासननियंत्रित दराचे गव्हाचे ८० बाचके आढळून आले. तसेच टेम्पोचा चालक हा मागील दोन महिन्यांपासून अशोक जी. आंबेकर यांच्या मालकीच्या असलेल्या सदर टेम्पोवर मासिक ७,५००/- रुपये पगारावर काम करीत असल्याचे सांगितले आहे. अधिकाऱ्यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानासमोर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ मध्ये असलेल्या गव्हाच्या बाचक्यांबाबत विचारणा केली असता, कमलेश रामजीत गुप्ता याने टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद याचे सोबत असलेली एक अज्ञात व्यक्ती (नांव माहिती नाही) हे दोघे त्याच्या दुकानात उपस्थित होऊन दुकानामधील गव्हाचे बाचके काळ्याबाजाराने मिळतीय काय, याबाबत विचारणा केली असता, सदर दुकान क्र. २५ ड/१९४ चे मेहता कमलेश रामजीत गुप्ता याने दुकानातील गव्हाचा साठा हा उपस्थित इसमांना काळ्याबाजाराने विकण्यास संमती दर्शविली असल्याचे जबाबात कबूल केले आहे. टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक व त्यासोबत असलेला

अज्ञात व्यक्ती यांनी कमलेश रामजीत गुप्ता याच्याशी संगणमत करुन सदरचा जप्त गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चा वापर अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक यांच्या अपरोक्ष जरी चालकानी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वर्सोवा पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०७/२०१२ दिनांक २७/०२/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दिनांक ०७/०३/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला टाटा टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे चालक रामसुरत जगन्नाथ प्रसाद
२) टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ चे मालक अशोक जी. आंबेकर
३) टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-१६२२ भाड्याने घेणारा अज्ञात व्यक्ती
४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानामधील मेहता, कमलेश रामजीत गुप्ता
५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड १९४ या दुकानाच्या प्राधिकारपत्रधारक सौ. शशीकला राजू सिंग
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वर्सोवा पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वर्सोवा पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.